# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.09.2025** **वारःशुक्रवार**

---

•पीएम कुसुम योजनेअंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्पांचं पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण; राज्यातही 2500 मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प सुरू

•ग्राहकाभिमुख सेवा देण्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं बँकांना आवाहन

•महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी 'एनडीआरएफ'मधून भरीव मदत देण्याची केंद्राकडे मागणी आणि

•आशिया करंडक क्रिकेटचा अंतिम सामना भारत-पाकिस्तान दरम्यान होणार

**पीएम-कुसुम**

प्रधानमंत्री कुसुम योजनेअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल चार राज्यातल्या सौर ऊर्जा प्रकल्पांचं लोकार्पण दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्रातल्या दोन हजार 458 मेगावॅट क्षमतेच्या 454 सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश आहे. पंतप्रधानांनी यावेळी सौर ऊर्जा प्रकल्पातील विविध लाभार्थ्यांशी संवादही साधला.

देशात सौर उर्जेवर चालणारे कृषीपंप बसवण्यात राज्याचा प्रथम क्रमांक असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. सौर ऊर्जा प्रकल्पांमुळं शेतीला दिवसा वीज उपलब्ध होत आहे. मागेल त्याला कृषी पंप दिले जात असून शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**निर्मलासीतारामन**

देशाच्या आर्थिक विकासात आर्थिक संस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल पुण्यात केलं. बँक ऑफ महाराष्ट्रच्या एक्काणवाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या

बोलत होत्या. बँकांनी ग्राहकाभिमुख सेवा द्यावी; तसंच तंत्रज्ञानाद्वारे बँकिंग सेवा सुधारणं आणि नवकल्पनांना महत्त्व देणं गरजेचं असल्याचं सीतारामन म्हणाल्या. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी लघु उद्योगांसाठी युवकांना कर्ज आणि इतर सेवा द्याव्यात, असंही त्यांनी सुचवलं.  सीतारामन यांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या नवीन औद्योगिक कार्यालयाचं उद्घाटन आणि झेन लाईफ मोबाईल बँकिंग ॲपचंही लोकार्पण केलं.

**<u>इंट्रो-</u>**

सेवा आणि सुशासन या मंत्रानं प्रेरित होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार परिवर्तन आणि प्रगती साध्य करण्यासाठी अथकपणे कार्यरत आहे. या अनुषंगानं सेवा पर्व या विशेष मालिकेत आज भारताच्या वृद्धिंगत ई-गवर्नन्स परिसंस्थेद्वारे सरकारनं केलेल्या विनासायास, पारदर्शी आणि समावेशक डिजीटल अनुभवाबद्दल जाणून घेऊ...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

सार्वजनिक सेवांपासून वित्तीय सक्षमीकरणापर्यंत भारताची ई-गवर्नन्स परिसंस्था नागरिकांच्या अनुभवाची व्याख्या बदलत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टिने मार्गदर्शित तंत्रज्ञानामुळे सरकारचा कारभार आता अधिक सहजप्राप्य आणि समावेशक झाला आहे. पंतप्रधान म्हणतात त्याप्रमाणे ई-गवर्नन्स सुलभ, परिणामकारक, परवडणारा आणि पर्यावरणपूरक अनुभव बनला आहे...

जन धन, आधार आणि मोबाईल ही त्रिवेणी भारताच्या सु-विकसित डिजीटल व्यवस्थेची गुरुकिल्ली बनली आहे. थेट लाभ हस्तांतरासाठी या त्रिवेणीचा वापर करुन सरकारी लाभ, सबसिडी आणि रक्कम थेट लाभार्थ्याच्या खात्यात पाठवली जाते. ई-केवायसीमुळे आधार-आधारित पडताळणी तत्काळ, कागद-विरहित तसंच घोटाळामुक्त पद्धतीनं होते. सरकारी ई-मार्केट म्हणजेच जेमने खरेदीत क्रांति आणली आहे, तसंच लक्षावधी लघु व्यवसाय, महिला उद्योजक आणि स्टार्टअप्स यांची भरभराट होत आहे. उमंग ॲप सरकारी सेवा घेण्यासाठी एकमेव मंच आहे, डिजीलॉकरमध्ये डिजीटल कागदपत्रं साठवता येतात, भाषिणीमुळे भाषांदरम्यान संवाद साधता येतो आणि आयगॉट कर्मयोगी एक मुख्य डिजीटल शिक्षण मंच आहे. सरकार आणि जनता यांच्या दरम्यान तंत्रज्ञान एक पुल बनले आहे. या सर्व मंचांमुळे कारभार आता काउंटर्सवर आणि व्हरांड्यात सीमित न राहता, डिजीटल, समावेशक आणि पारदर्शी पद्धतीने भारताच्या प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचत आहे.

**<u>पाऊस</u>**

महाराष्ट्रात झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळं झालेलं शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान यासाठी ‘एनडीआरएफ’मधून भरीव मदत देण्यात यावी, अशी मागणी करणारं सविस्तर निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांना दिलं आहे. याबाबत केंद्र सरकारला सविस्तर प्रस्ताव लवकरच पाठवला जाईल, असंही या निवेदनात म्हटलं आहे.

कालपर्यंत 17 लाख हेक्टरवरील पिकांचे पंचनामे झाले असून, लवकरच यासंदर्भात शासन निर्णय निघेल, असं आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपुरात दिलं. पडलेली घरं, खरडलेल्या जमिनी यासाठी शेतकऱ्यांना स्वतंत्र मदत मिळणार असून आपत्ती व्यवस्थापन निधीतून वाटप सुरू झालं असल्याचं त्यांनी सांगितलं.

पुण्यात झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी अधिकारी - कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले.

धाराशिवमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी परिस्थितीची पाहणी केली.

धाराशिवमधील पूरस्थितीचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून...

धाराशिव जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून दर काही दिवसांनी उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील 363 गावं बाधित झाली असून दोन लाख 26 हजार 706 हेक्टर क्षेत्रावरील शेती पाण्याखाली गेली आहे. या अतिवृष्टीचा फटका एक लाख 98 हजार शेतकऱ्यांना बसला आहे. अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विविध ठिकाणी अडकून पडलेल्या 498 नागरिकांची राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक, तसंच जिल्हा आपत्ती प्राधिकरणाच्या पथकानं आणि लष्कराच्या जवानांनी सुटका केली आहे. बाधित क्षेत्रांचे पंचनामे युद्ध पातळीवर सुरू आहेत, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार तसंच आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी धाराशिव जिल्ह्यातील विविध भागांना भेटी देऊन पाहणी केली. धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी आपत्तीग्रस्तांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केलं. याशिवाय परंडा तालुक्यातील अनेक गावात नागरिकांना वैद्यकीय सुविधा आणि अन्नाची पाकिट पुरवण्यासाठी संघाचे स्वयंसेवक मेहनत करत आहेत.

सोलापूर जिल्ह्यात सीना कोळेगाव प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी पूर नियंत्रण व्यवस्थापनामध्ये समन्वय ठेवला नाही. त्यामुळे हा पूर आल्याच्या तक्रारी आल्या असून या अनुषंगानं चौकशी करण्यात येईल, असं आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिलं.

बीड जिल्ह्यातही अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. बीडमधील पूरपरिस्थितीचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून...

बीड जिल्ह्यात सलग पाच दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातल्या २०० हून अधिक मध्यम आणि लघुप्रकल्पांना पूराचा गंभीर धोका निर्माण झालेला आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील तलाव, बंधारे, रस्ते आणि पुलांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तसंच लाखो हेक्टरावर शेती जमिनी खरडून वाहून गेल्या आहेत. माजलगाव प्रकल्प हा शंभर टक्के भरलेला असून इतर 167 मध्यम आणि लघु प्रकल्प शंभर टक्के भरुन वहात आहेत.

केज आणि माजलगाव तालुक्यातल्या ४ गावांमधल्या नागरिकांना पूर परिस्थितीमुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आलं. बीड, गेवराई तालुक्यात पूर परिस्थितीमध्ये अडकलेल्या ४० पेक्षा अधिक नागरिकांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफच्या पथकानं शर्थीचे प्रयत्न केले. तसेच आष्टी तालुक्यातल्या कडी नदीला महापूर आल्यानं सैन्य दलानं हेलीकॉप्टरच्या सहाय्यानं नागरिकांना स्थलांतरीत केलं.

बुलडाणा जिल्ह्यात पालकमंत्री संजय सावकारे, हिंगोली जिल्ह्यात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे तर नांदेड जिल्ह्यात जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली.

धुळे तालुक्यातील बोरी पट्ट्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानं कापूस, मका, बाजरी, ज्वारी, भाजीपाला आणि फळ बागायतीचं मोठं नुकसान झालं आहे.

गडचिरोली शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात कालपासून मुसळधार पाऊस पडत आहे.

भारतीय लष्कराच्या दक्षिण मुख्यालयांनं स्थानिक प्रशासनाच्या सहकार्यानं  धाराशिव, परभणी, बीड आणि सोलापूर जिल्ह्यामध्ये पूरग्रस्तांसाठी मोहीमा राबवल्या तसंच तातडीची मदत पोहोचवली.

पूरग्रस्तांना मदत म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेतल्या प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी  एक दिवसाचं वेतन देण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>मेकइनइंडिया/पूल-मेघना</u>**

पुढील 25 वर्षांत जागतिक अर्थव्यवस्थेचा एक मोठा भाग बनू शकतील अशा उदयोन्मुख क्षेत्रांना 'मेक इन इंडिया 2.0' उपक्रमात मुख्य प्राधान्य दिलं जाईल, असं केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी काल सांगितलं. ते मुंबईत एका पुरस्कार सोहळ्यात बोलत होते. भक्कम आर्थिक कामगिरी आणि राजकीय स्थिरता या आधारे दीर्घकालीन सुधारणांवर भर दिला जात आहे असं शहा यावेळी म्हणाले.

**<u>दीनदयाळ उपाध्याय</u>**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती काल देशभरात अंत्योदय दिवस म्हणून साजरी करण्यात आली. उपाध्याय हे एकात्म मानवतावादाचं मूर्तिमंत प्रतीक असल्याचं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. तर उपाध्याय हे मानवतेचे पुजारी होते, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर फोर फेरीत काल पाकिस्ताननं बांगलादेशचा १४ धावांनी पराभव करत अंतिम फेरी गाठली. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्ताननं २० षटकांत ८ बाद १३५ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल बांगलादेशचा संघ १२४ धावा करू शकला. अंतिम सामना भारत आणि पाकिस्तान यांच्यात परवा २८ तारखेला खेळला जाईल.

**<u>हवामान</u>**

बंगा**ल**च्या उपसागरावर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळं राज्याच्या विविध भागांमध्ये आजपासून तीन दिवस ढगाळ हवामान आणि पावसात वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार